`

**बातमीपत्र**

**पोलीस आयुक्तालय, सोलापूर शहर**

**माहिती कक्ष, दि २० ऑगस्ट २०२५**

# जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५८०/२०२५ भा.न्या.सहिंता कलम १०८,३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १८/०८/२०२५ रोजी १९.०० वा चे सुमारा पुर्वी ५६४,पश्चिम मंगळवार पेठ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०८/२०२५ रोजी २३.१३ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | सफौ नसरूद्दीन मोहमद शरीफ शेख,नेम- जोडभावी पेठ सोलापूर शहर |
| **आरोपीचे नाव** | : | १) अमरनाथ बसवेश्वर रासुरे २) सोमनाथ रासुरे ३) धनश्री, आडके ४) मल्लिकार्जुन सारंगमठ रा-पश्चिम मंगळवार पेठ सोलापूर |
| **मयताचे नाव** | | बसवेश्वर इराप्पा रासुरे वय-७५ वर्षे,रा-५६४,पश्चिम मंगळवार पेठ सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, दि १८/०८/२०२५ रोजी १९.०० वा चे सुमारा पुर्वी ५६४,पश्चिम मंगळवार पेठ सोलापूर यांना वरील अरोपीत मजकूर यांनी मयताचे मृत्युस कारणीभूत असल्याचे सदर चिठ्ठीत नमुद असल्याने व सदर इसमांनी सदर मयतास आत्महत्या करण्यास प्रवृत्त केल्याचे प्राथामिकदृष्टया दिसून येत असल्याने फिर्यादीची कायदेशीर फिर्यादी दाखल आहे.म्हणून तपास-पोसई बामणे-९६३७६४६५४७ |

# जोडभावी पेठ पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ५८१/२०२५ भा.न्या.सहिंता कलम ११८(१),३५२(२) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि १९/०८/२०२५ रोजी १७.०० वा चे सुमारास चिरागअली तकीया जवळ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०८/२०२५ रोजी २३.२४ वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | मिर महमद कासिम आलमेलकर,वय-४३ वर्षे,रा- जोडभावी पेठ सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | ईस्माईल कोनेकर,रा- चिराग अली तकीया जोडभावी पेठ सोलापूर शहर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, वरील वेळी व ठिकाणी यातील फिर्यादीचे घराजवळ राहणारा यातील आरोपी मजकूर यांने फिर्यादीचा मुलगा यास विनाकारण ये सैतान सैतान म्हणून बोलत असल्याने फिर्यादी त्यांचे घराजवळ जावून मुलाला कशासाठी सैतान म्हणून बोलावत असे विचारण्यासाठी गेले असता आरोपीने फिर्यादीस शिवीगाळ करून लाकडी काठीने फिर्यादीचे दोन्ही पायावर व मांडीवर मारले आहे. म्हणून तपास- पोह/१७४/सांळुंखे-९०११४१५९९९ |

# सदर बझार पोलीस ठाणे

| | | |
|---|---|---|
| **गु.र.नं व कलम** | : | ६७२/२०२५ भा.न्या.सहिंत कलम ३१८(४),३३५,३३६,३३६(२),३३६(३),३३७,३३९,३४०(२),३४१(१),३(५) प्रमाणे |
| **गु.घ.ता.वेळ/ठि.** | : | दि २५/०७/२०२५ रोजी दुय्यम निंबधक कार्यालय सोलापूर उत्तर ३ सोलापूर |
| **गु.दा.ता.वेळ** | : | दि १९/०८/२०२५ रोजी २०.०० वा. |
| **फिर्यादीचे नाव** | : | नामदेव राजाराम गरड,वय-७५ वर्षे,रा- अंतर भारती प्रशाले जवळ टेंभुर्णी रोड कुर्डुवाडी ता.माढा सोलापूर |
| **आरोपीचे नाव** | : | १) सलीम हमजु शेख २) शिवाजी श्रीपती दास ३) सुभाष खाडे ४) बब्रुवान पाटील ५) दत्तात्रय कुंभार ६) कल्याण बाबर ७) आकाश बागल ८) योगेश गिरी ९) अतुल चोपडे १०) प्रियंका चोपडे ११) दिपाली भोरे १२) कृष्णा वटाने १३) प्रिया अंधारे १४) प्रविण चोपडे १५) संभाजी नाईकवाडे १६) महेश तांबारे १७) कुबेर जगताप १८) ज्ञानेश्वर माने १९) किरण बागल २०) ज्योतीराम बागल २१) रवि बागल २२) अरविंद बागल रा-सर्व माढा जि सोलापूर |
| **हकिकत** | : | यात हकिकत अशी की, यात हकीकत अशी की यातील अरोपीत मजकूर यांनी आपआपसात संगनतम करून डीसीसी बॅक कर्मचारी सहकारी गृहनिर्माण संस्थेने मोजे भोसरे ता.माढा जि.सोलापूर येथील मुळ गट क्र ६४ मधील १ हेक्टर ९० आर जागेमधील प्लॉट नं ६४/१/३८ हे रस्ता व ओपन स्पेसचे राखीव क्षेत्र प्लॉट धारकासाठी राखुन बनावट व खोटी मिटींग दाखवून ठराव करून बनावट व खोटी मोजणी दर्शवून त्याचा बनावट व खोटा नकाशा तयार करून त्यावर उप अधीक्षक भुमी अभिलेख माढा यांचे बोगस व बनावट सही शिक्के मारून तसेच तहसिलदार यांचे बोगस व बनावट सही शिक्के मारून खोटा नकाशा तयार करून ते जाणीवपुर्वक खरा म्हणून वापरुन खरेदी खतात जोडून शपथेवर खोटे कथन करून खोटे शपथपत्र जोडून फिर्यादी व संस्थेच्या इतर प्लॉट धारकांची बनावट कागदपत्रे तयार करून शासनाची फसवणुक करून नमुद ठिकाणी दस्त क्र ५४३६/२०२५ दि २५/०७/२०२५ दस्त क्र ५४३७/२५ दस्त क्र ५४३८/२५ दस्त क्र ५४७९/२५,दस्त क्र३६८६/२५ दस्त क्र ३६८८/२५ दस्त क्र ७१३६/२५ दस्त क्र ७१३७/२५ असे नोंदवून संस्थेने प्लॉट धाराकरीता रस्ता व ओपन स्पेस म्हणून राखुन ठेवलेली एकूण ५७४७.२ चौमी जागा बळकावून शासकीय बाजार भावापेक्षा कमी किंमतीमध्ये आपआपसात खरेदी विक्री करून मोठया प्रमाणात आर्थिक गैरव्यवहार केला आहे.म्हणून तपास- सपोनि कुलकर्णी-**९७६५९००१००** |